भंडारा जिल्हा पोलीस वार्तापत्र

(सकाळ)

जा.क्र. ५७५/माहिती कक्ष/वार्तापत्र
पोलीस अधीक्षक कार्यालय, भंडारा
दिनांक १६/०८/२०१७

**१) मोटार सायकलने सालकल चालकास धडक देवुन जखमी करण्यास कारणीभुत झाल्याने गुन्हा नोंद . :-**

दिनांक १४/०८/२०१७ चे २१.३० वा. दर. यातील फिर्यादी जयकिशन बाळकृष्ण चावके वय ४५ वर्ष, रा. हसारा टोली हा आपले सायकलने हसारा येथे तुमसर ते कंटगी डांबरी रोडने जात असतांना समोरुन येणाऱ्या यातील आरोपी चालकाने आपले ताब्यातील मोटार सायकल हयगयीने व निष्काळजीपणाने चालवुन फिर्यादीचे सायकलला औदयोगिक प्रशिक्षण संस्था ते तुमसर कंटगी रोडवर धडक मारुन जखमी करण्यास कारणीभुत झाल्याने फिर्यादी यांचे तोंडी रिपोर्ट वरुन पोलीस स्टेशन तुमसर येथे कलम २७९,३३७ भादंवि. अन्वये गुन्हा दाखल करण्यात आला. पुढील तपास सफौ. शहारे पो.स्टे. तुमसर हे करीत आहेत.

**२) विधी संघर्षित बालकाने सोन्याचे दागीने चोरुन नेल्याने गुन्हा नोंद . :-**

दिनांक १३/०८/२०१७ चे ०९.०० वा. दर. यातील फिर्यादी योगेन्द्र उर्फ प्रदिप गोविंदराव भुरे वय ४२ वर्ष, रा. रामकृष्ण नगर तुमसर यांचे घरात विधीसंघर्षित बालक हा फिर्यादीचे घरामध्ये साफसफाई करित असतांना घरामधील कपाटात ठेवलेले मंगळसुत्र (चपलाकंठी) ०२ नग १०० ग्रॅम, पाटली (कंगन) ०२ नग ३० ग्रॅम, मोहणमाळ ०१ नग २० ग्रॅम, कानातील रिंग ०१ नग ०३ ग्रॅम असा एकुण ४,५९,०००/-रु. चा माल चोरुन नेल्याने फिर्यादी यांचे रिपोर्ट वरुन पोलीस स्टेशन तुमसर येथे कलम ३८० भादंवि. अन्वये गुन्हा दाखल करण्यात आला. पुढील तपास सपोनि. उईके पो.स्टे. तुमसर हे करीत आहेत.

**३) मोटार पंपची चोरी . :-**

दिनांक १४/०८/२०१७ चे १९.००ते १५/०८/२०१७ चे ०७.०० वा. दर. यातील अज्ञात आरोपी ने कुणीही नसल्याची संधी साधुन फिर्यादीचे शेतातील विहीरीवर लावलेली १ टेक्स्मो कंपनीची मोटारपंप, सिआरआय कंपनीची मोटार पंप १ एचपी ची एकुण ११,०००/-रु. च्या चोरुन नेल्याने फिर्यादी विनोद प्यारेलाल गोपाले वय ४१ वर्ष, रा. आसलपाणी यांचे तोंडी रिपोर्ट वरुन पोलीस स्टेशन गोबरवाही येथे कलम ३७९ भादंवि. अन्वये गुन्हा दाखल करण्यात आला. पुढील तपास सफौ. मोदनकर पो.स्टे. गोबरवाही हे करीत आहेत.

**४) दोन मोटार पंपाची चोरी . :-**

दिनांक १३/०८/२०१७ चे २०.०० ते १४/०८/२०१७ चे ०७.०० वा. दर. यातील फिर्यादी श्यामकुमार राजाराम भुरे वय ५२ वर्ष, रा. राजेन्द्र नगर तुमसर याने तामसवाडी भेद्रेखाई शेतावरील विहीरीवर पाण्याकरीता लावलेली १) १ एचपी किर्लोस्कर कंपनीची जुनी ईलेक्ट्रीक मोटार पंप किंमती अदाजे ४,०००/-रु. २) किलोस्कर कंपनीची २.३ एच पी ईलेक्ट्रीक मोटार पंप किंमती ८,५००/-रु. असा एकुण १२,५००/-रु. चा माल चोरुन नेल्याने फिर्यादी श्यामकुमार राजाराम भुरे वय ५२ वर्ष, रा. राजेन्द्र नगर तुमसर यांचे तोंडी रिपोर्ट वरुन पोलीस स्टेशन तुमसर येथे कलम ३७९ भादंवि. अन्वये गुन्हा दाखल करण्यात आला. पुढील तपास सफौ. मोदनकर पो.स्टे. तुमसर हे करीत आहेत.

**५) बस हयगयीने चालवुन मोटार सायकल चालकास धडक देवुन जखमी केले. . :-**

दिनांक १२/०८/२०१७ चे ०६.३० वा. दर. यातील जखमी विद्याधर माहुरे हा आपले मोटार सायकल क्र. एमएच ३६/५५२३ ने विरली खंदार येथे शाळे मध्ये जात असतांना सोमनाळा गावाजवळ अडयाळ कडुन येणाऱ्या यातील आरोपी चालकाने आपले ताब्यातील बस हयगयीने, निष्काळजीपने चालवुन फिर्यादीचे मोटार सायकला धडक मारुन जखमी करण्यास कारणीभुत झाल्याने सरतर्फे फिर्यादी पोना. साठवणे यांचे रिपोर्ट व डॉ. मेमो वरुन पोलीस स्टेशन अडयाळ येथे कलम २७९,३३७,३३८ भादंवि. अन्वये गुन्हा दाखल करण्यात आला. पुढील तपास पोना. भोगे पो.स्टे. अडयाळ हे करीत आहेत.

६) ट्रॅक्टरच्या धडकेत दोन जखमी . :—

दिनांक २५/०७/२०१७ चे ११.०० वा. दर. यातील फिर्यादी प्रविण पटवारी नान्हे वय २६ वर्ष, रा. मासळ याने आपली मोटार सायकल वर मागील सिटवर बुध्दवान रामटेके वय २६ वर्ष, रा. मासळ यास बसवुन मोटार चालवित असतांना मांगली कडुन किटाळी कडे जात असतांना यातील आरोपी चालकाने आपलेताब्यातील ट्रॅक्टर भरधाव वेगाने, निष्काळजीपणे चालवुन फिर्यादीचे मोटार सायकल धडक मारुन मोटार सायकल चालक व मागे बसणाऱ्याला किरकोळ व गंभिर जखमी करण्यास कारणीभुत झाल्याने फिर्यादीचे बयान, डॉ. रिपोर्ट व चौकशी अहवाला वरुन पोलीस स्टेशन पालांदुर येथे कलम २७९,३३७,३३८ भादंवि. अन्वये गुन्हा दाखल करण्यात आला. पुढील तपास पोहवा. राऊत पो.स्टे. पालांदुर हे करीत आहेत.

७) अवैध दारु/जुगार अडयावर धाडी . :—

दिनांक १५/०८/२०१७ रोजी भंडारा जिल्हा पोलीसांनी पोस्टे लाखांदुर व भंडारा येथे दारू/ जुगार अडयावर धाडी घालुन एकुण ०३ गुन्हे दाखल करून आरोपीतांच्या ताब्यातुन ०९ लिटर देशी दारू किंमती २५००/—रु. व जुगारातुन किंमती ४१५/—रु. असा एकुण किमती २,९१५/रु चा माल जप्त करण्यात आला आहे.

16.8

(एस. व्ही. कुलकर्णी )
पोलीस उपअधिक्षक (गृह)
भंडारा
दुरध्वनी.क्र. ९९८७३८५४०५

प्रति,

जिल्हा माहिती अधिकारी, भंडारा
वर्तमान पत्राचे संपादक व जिल्हा प्रतिनिधी यांना उपरोक्त माहीती दैनिक वर्तमान पत्रात प्रसिध्द करण्याकरीता कळविण्यास विनंती आहे.

**प्रत, संगणक कक्ष,** भंडारा यांना भंडारा पोलीस संकेतस्थळावर ठेवण्याकरीता.